# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२३३/२०२५ — दि. १०/१०/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** डोंबिवली वाहतूक उप विभागाच्या हद्दीत दि. १९/१०/२०२५ रोजी रात्रौ २३:५५ वा. ते दिनांक २०/१०/२०२५ रोजी दुपारी १५:०० वा. पावेतो फडके रोड, बाजी प्रभु चौक ते आप्पा दातार चौक येथे दिपावली सणा निमित्ताने सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतो. सदर कार्यक्रमा करीता मोठया प्रमाणात नागरीक, महिला, युवक, युवती हे सदर ठिकाणी हजर असतात. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** फडके रोडवरील बाजीप्रभू चौक ते आप्पा दातार चौक पर्यंत येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **संपूर्ण फडके रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाकुर्ली जोशी हायस्कूल समोरील रोडने नेहरू रोड मार्गे स्टेशन कडे तसेच फडके रोड कडे येणारी वाहने टिळक रोडने सावरकर रोड, इंदिरा चौक मार्गे व स्टेशन परिसरात इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १९/१०/२०२५ रोजी रात्रौ २३:५५ ते दिनांक २०/१०/२०२५ रोजी दुपारी १५:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीस्तव,**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**<u>प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,</u>**

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.